**ठळक बातम्या**

- राज्यातल्या २९ महापालिकांसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण, उद्या सकाळी साडे १० वाजता मतमोजणी सुरू होणार

- १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीची रणधुमाळी उद्यापासून सुरू होणार

- समाजातल्या सर्वांत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणं हाच भारतीय लोकशाहीचा अर्थ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- पश्चिम बंगाल सरकारनं ईडी विरोधात दाखल केलेले FIR सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगित

**आणि**

- यंदाच्या प्रजासत्ताक दिनाला प्रमुख पाहुणे म्हणून युरोपीय कौन्सिल आणि युरोपियन आयोगाचे प्रमुख उपस्थित राहणार

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी आज मतदान झालं. सर्व महानगरपालिकांमधे मिळून सरासरी ५० टक्क्यांपर्यंत मतदान झाल्याचा अंदाज राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी व्यक्त केला. गेल्यावेळेच्या निवडणुकीपेक्षा यंदा अधिक मतदान झाल्याची माहिती त्यांनी दिली. उद्या सकाळी साडे दहा वाजता मतमोजणीला सुरुवात होणार असून ४ पर्यंत चित्र स्पष्ट होईल, असा अंदाज आहे.

दुपारी साडेतीन वाजेपर्यंत आलेल्या आकडेवारीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेत सुमारे ४२ टक्के मतदान झालं. कोल्हापूर महानगरपालिकेत

सर्वाधिक सुमारे ५१ टक्के तर जळगावमधे सर्वात कमी सुमारे ३४ टक्के इतकंच मतदान झालं.

<><><><><>

राज्यात महापालिका निवडणुकीत मतदानानंतर मतदारांच्या बोटाला लावलेली शाई पुसण्याचे प्रकार उघडकीला येत आहेत. याबद्दल विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. यामुळे बोगस मतदानाची शक्यता फेटाळता येत नसल्याचं मंत्री संजय शिरसाठ यांनी व्यक्त केली. विरोधी पक्षाच्या काही नेत्यांनीही हीच भिती व्यक्त केली आहे.

काही ठिकाणी सर्व मतांची नोंद झाल्यावर ‘बीप’ आवाज येत नसल्याचा दावा खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. यामुळं सर्व प्रक्रिया संशयात सापडली असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.

<><><><><>

मतदारांनी एकदा मतदान केल्यानंतर त्याची नोंद घेतलेली असते. त्यामुळे फक्त शाई पुसून पुन्हा मतदान करता येणार नाही, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं होतं. शाई पुसायचा प्रयत्न करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करणं हे चुकीचं आहे, मतदानानंतर बोटावर लावलेली शाई पुसून एखादी व्यक्ती पुन्हा मतदानाला आल्याचं आढळून आलं, तर त्या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई केली जाते, असंही आयोगानं म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यात काही ठिकाणी मतदानाच्या प्रक्रियेत अडथळे आल्याचंही दिसून आलं. छत्रपती संभाजीनगरमध्ये मतदानाचा प्रयत्न करणाऱ्या ८ बनावट महिला मतदारांना पोलिसांनी अटक केली. पुणे महानगरपालिकेच्या मतदानाच्या वेळी ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने दुपारपर्यंत २० कंट्रोल युनिट्स आणि ५२ बॅलेट युनिट्स बदलण्यात आली. पिंपरी-चिंचवडमध्ये १५ ते २० ईव्हीएम्समध्ये

बिघाड झाल्याचं माहिती पिंपरी-चिंचवडच्या निवडणूक प्रभारींनी सांगितलं. धुळ्यात प्रभाग क्रमांक १८ मध्ये भाजपाच्या कार्यकर्त्यांनी मतदान यंत्राची तोडफोड केली असा आरोप शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सतीश महाले यांनी केला. इथले मतदान काही वेळानंतर पुन्हा सुरू झाले. प्रशासनाकडून या घटनेची चौकशी सुरू आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी उद्यापासून अर्ज भरायला सुरुवात होणार आहे. २१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने यासाठी अर्ज भरता येतील. या टप्प्यात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांसाठी निवडणुका होणार आहेत.

**<><><><><>**

भारतानं आपल्या विविधतेतून आपली लोकशाही बळकट केली. समाजातल्या सर्वांत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणं हाच भारतीय लोकशाहीचा अर्थ आहे आणि कोणताही भेदभाव न करता सामाजिक हित साधण्यासाठी सरकार काम करत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं राष्ट्रकुल संघटनेतल्या देशांचे पीठासीन अधिकारी आणि अध्यक्षांच्या परिषदेला ते संबोधित करत होते. लोकशाही संस्था आणि लोकशाही प्रक्रियांमुळे लोकशाही राज्यपद्धतीला स्थैर्य आणि वेग मिळतो, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. या परिषदेचं महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले,

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाजमाध्यमांनी लोकशाही संस्थांची कार्यक्षमता वाढवली आहे, असं मत लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी यावेळी मांडलं. या परिषदेत महत्त्वाच्या जागतिक प्रश्नांवर चर्चा होईल आणि ठोस धोरणात्मक निर्णय

घेतले जातील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. भारतीय संसदेची गेल्या ७ दशकांची वाटचालही त्यांनी अधोरेखित केली.

***होल्ड... बाईट- ओम बिर्ला***

राष्ट्रकुल संघटनेतल्या ४२ सदस्य देशांचे ६१ अध्यक्ष आणि पीठासीन अधिकारी या परिषदेत भाग घेत आहेत.

**<><><><><>**

कोलकता इथं ईडी, अर्थात सक्तवसुली महासंचालनालयानं नुकत्याच केलेल्या छापेमारीबद्दल पश्चिम बंगाल पोलिसांनी ईडीच्या अधिकाऱ्यांविरुद्ध नोंदवलेल्या FIR ला सर्वोच्च न्यायालयानं आज स्थगिती दिली. आय-पॅक या राजकीय सल्लागार कंपनीच्या परिसरात आणि तिचे सहसंस्थापक प्रतीक जैन यांच्या घरी गेल्या आठवड्यात ईडीनं हे छापे टाकले होते. त्यावेळी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या संमतीनं पोलिसांनी त्यात अडथळे आणल्याचा आरोप करत ईडीनं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

या प्रकरणी पश्चिम बंगालच्या पोलीस महासंचालकासह वरीष्ठ पोलीस अधिकारी आणि इतरांवर कारवाई करावी, असा अर्जही ईडीनं न्यायालयाकडे केला आहे. न्यायालयानं ममता बॅनर्जी, पोलीस महासंचालक राजीव कुमार, कोलकत्याचे पोलीस आयुक्त आणि इतरांना नोटीस दिली आहे. त्यावर प्रतिज्ञापत्राद्वारे उत्तर देण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत दिली असून, पुढची सुनावणी ३ फेब्रुवारीला होणार आहे. तोपर्यंत छापे घातलेल्या ठिकाणांच्या परिसरातल्या सीसीटीव्ही फुटेजचं चित्रण आणि इतर उपकरणांचं जतन करण्याचे निर्देशही न्यायालयानं हंगामी आदेशात दिले आहेत.

**<><><><><>**

झारखंडमध्ये रांची जमीन घोटाळा प्रकरणात मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी ईडीच्या समन्सचं उल्लंघन केल्याप्रकरणी खटला पुढे चालू ठेवण्याची परवानगी

आज उच्च न्यायालयाने दिली. जमीन घोटाळ्याच्या चौकशीसाठी समन्स बजावूनही सोरेन हजर राहिले नाहीत, असा आरोप करत ईडीने तक्रार दाखल केल्यानंतर विशेष न्यायालयाने कार्यवाही सुरू केली होती.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज ५२ माओवाद्यांनी  सुरक्षादलासमोर शरणागती पत्करली. यामध्ये २१ महिलांचा समावेश असून त्यांच्यावर एकूण एक कोटी ४५ लाख रुपयांची बक्षिसं होती. हे सर्व माओवादी भैरमगड परिसरात कार्यरत होते. सरकारी पुर्नवसन योजनेनुसार शरण आलेल्या प्रत्येक माओवाद्यांना प्रत्येकी पन्नास हजार रुपयाचं अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

**<><><><><>**

७७व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून युरोपीय कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कॉस्टा आणि युरोपीय कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देर लेयेन उपस्थित राहणार आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलेलं आमंत्रण स्वीकारुन हे दोघे ३ दिवसांच्या भारत भेटीवर येणार आहेत. या दौऱ्यात ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना भेटून द्विपक्षीय चर्चा करतील. २७ जानेवारीला आयोजित भारत युरोपीय संघ शिखर परिषदेचं अध्यक्षपद ते संयुक्तपणे भूषवतील.

**<><><><><>**

महिला प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेत आज नवी मुंबईतल्या डी वाय पाटील स्टेडिअमवर मुंबई इंडियन्स आणि युपी वॉरीअर्स यांच्यात सामना सुरु आहे. युपी वॉरीअर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या ९ षटकात २ बाद ४७ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**